**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**पुणे वृत्तांत**
**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक: 03.04.2024** **वार: बुधवार**

---

**<u>निवडणूक</u>**

कारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी असे निर्देश शिरुर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी अजय मोरे यांनी आज दिले. शिरूर लोकसभा मतदार संघांतर्गत क्षेत्रीय, मतदानस्तरीय, आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

**<u>शपथ</u>**

पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यातील जवळे गावात अक्षय लोखंडे आणि उत्कर्षा घोडेकर यांच्या विवाहाच्या वेळी स्वीप पथकाच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेल्या मतदान जनजागृती फेरीतील विद्यार्थ्यांनी वऱ्हाडी मंडळीला मतदानाचं आवाहन केलं. त्याला प्रतिसाद देत सर्वांनी मतदान करण्याची प्रतिज्ञा घेतली आणि संकल्प पत्र भरुन दिलं. शिरुर लोकसभा मतदार संघाअंतर्गत आंबेगाव विधानसभा मतदार संघातील स्वीप पथक ठिकठिकाणी मतदान जनजागृती करत आहे.

**<u>पाणी</u>**

पुणे शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता मुळशी धरणातुन ५ टीएमसी पाणी घ्यावं लागणार आहे. शहरात पाणी कपात केली जाणार नाही. मात्र नागरिकांनी पाणी साठ्याचा विचार करुन पाणी जपूनच वापरण्याचं आवाहन पुणे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी केलं आहे. पुणे महापालिका हद्दीत समाविष्ट

झालेल्या ३४ गावांमध्ये जलवाहिन्यांचं मोठं जाळं नसल्यामुळं पाणीपुरवठा करण्यास अडचण येत आहे.

**<u>पिपाणी</u>**

पुणे शहरात पिण्याचं पाणी बांधकामांसाठी वापरलं तर बांधकामं बंद करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशाराही डॉक्टर भोसले यांनी दिला आहे. पाणी टंचाईबाबत पाणीपुरवठा विभागाच्या आढावा बैठकीनंतर ते पत्रकार परिषदेत  बोलत होते. बांधकाम व्यवसायिकांनी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रातून पाणी घेणं बंधनकारक असल्याचं आयुक्तांनी सांगितलं.

**<u>महसूल</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवाना आणि अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागानं गेल्या आर्थिक वर्षात महसुली उत्पन्नात, ८०४ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. मागील आर्थिक वर्षीपेक्षा या उत्पन्नामध्ये २० कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

**<u>राणे</u>**

पुण्याची खासदारांची विशेष परंपरा मुरलीधर मोहोळ दिल्लीत येऊन नक्की जोपासतील असा विश्वास केंद्रीय उद्योग मंत्री नारायण राणे यांनी आज पुण्यात व्यक्त केला. महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी राणे यांच्या पुण्यातील निवासस्थानी जाऊन भेट घेतली. त्यावेळी शुभेच्छा देताना राणे बोलत होते.

**<u>वंचित</u>**

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वसंत मोरे यांनी  आज जिल्हाधिकारी कार्यालयातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केलं.

यावेळी त्यांनी पत्रकारांशी बोलताना विविध राजकीय, सामाजिक विषयांवर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

**परिचारिका**

नर्सिंग व्यवसायात परिचारिका घेत असलेल्या रूग्णांच्या वैयक्तिक काळजीची जागा कृत्रिम बुद्धिमत्ता घेऊ शकत नाही, असं मत जहांगीर रुग्णालयाच्या मुख्य नर्सिंग सुपरिटेंडंट नीता अहिरराव यांनी आज व्यक्त केलं. डीईएस सुभद्रा के. जिंदाल कॉलेज ऑफ नर्सिंगचा मेळाव्यात त्या बोलत होत्या. महापालिकेच्या वैद्यकीय उपाधिकारी डॉक्टर कल्पना बलिवंत यानी याप्रसंगी बोलताना रुग्ण आणि परिचारिका यांच्यामध्ये निर्माण झालेल्या भावनिक नात्यामुळं, आजारपणातून लवकर बरे होण्यास मदत होते, असं मत व्यक्त केलं.

**डायलिसिस**

पुणे महापालिकेच्या वतीनं शहरात सात ठिकाणी सुरु असलेल्या डायलिसिस सेंटरमधील सत्तावन यंत्रांद्वारे वर्षभरात ६४ हजार ३८७ रूग्णांनी लाभ घेतला असल्याची माहिती सहायक आरोग्य अधिकारी डॉक्टर संजीव वावरे यांनी दिली. पीपीपी तत्वावरील या प्रकल्पामुळे गरीब आणि गरजू रुग्णांना हा उपचार अत्यल्प दरामध्ये उपलब्ध झाला आहे.

**दुकान**

पुण्याजवळील ऐतिहासिक किल्ले सिंहगडावरील अधिकृत खाद्य व्यावसायिकांना लवकरच त्यांच्या हक्काचं दुकान उपलब्ध होणार आहे. वन विभागाकडून उभारण्यात आलेल्या खाद्य पदार्थ विक्रीच्या दुकानांचं काम अंतिम टप्प्यात असून एकंदर ७० अधिकृत खाद्य विक्रेत्यांना त्यांचं सोडत पद्धतीनं वाटप केलं जाणार आहे.

**पथकर**

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार राष्ट्रीय महामार्गावरील पथकर नाक्यांवर झालेली दरवाढ निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लांबणीवर टाकण्यात आली आहे. त्यामुळं पुणे सातारा मार्गावरील खेड शिवापूर नाका त्याचबरोबर नाशिक मार्गावरील चाळकेवाडी इथली दरवाढ स्थगित करण्यात आली आहे.

**निवड**

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या पुणे केंद्राच्या अध्यक्षपदी सुनील मते यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेच्या नुकत्याच झालेल्या वार्षिक बैठकीत नव्या आर्थिक वर्षाकरिता कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार**.